पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. क्रीडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १४

**सभावृत्तांत**

दिनांक - **०१/०४/२०१५** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०१/०४/२०१५** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा. ननवरे जितेंद्र बाबा - सभापती**
**२)** मा. तानाजी विठ्ठल खाडे
**३)** मा. मोटे किरण बाळासाहेब
**४)** मा. सुपे आशा रविंद्र
**५)** मा. सौ.साळुंके सविता सुरेश
**६)** मा. गिता सुशिल मंचरकर
**७)** मा. बारणे निलेश हिरामण

या शिवाय मा.फुंदे – सहा.आयुक्त, मा.जगताप – नगरसचिव, मा.बेंडे – प्रशासन अधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.२ – मा.क्रीडा समिती सभेकडे नव्याने कामकाज सोपविणे, विशेष अधिकार देणेबाबत - मा.किरण मोटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३ – खेळाडू दत्तक योजनेच्या अटी व नियम यामध्ये दुरुस्ती करणेबाबत - मा.किरण मोटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.आशा सुपे

दिनांक ०१/०४/२०१५ ची क्रीडा समिती पाक्षिक सभा सोमवार दिनांक ०६/०४/२०१५ रोजी दुपारी १२.०० वा.पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभपती -** सोमवार दिनांक ०६/०४/२०१५ रोजी दुपारी १२.०० वा.पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **ननवरे जितेंद्र बाबा** )
**सभापती**
क्रीडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. क्रीडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १४

**सभावृत्तांत**

( दिनांक ०१/०४/२०१५ ची तहकूब सभा )

दिनांक - **०६/०४/२०१५** वेळ - दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा समितीची दिनांक ०१/०४/२०१५ ची तहकूब सभा सोमवार दिनांक **०६/०४/२०१५** रोजी दुपारी **१२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा. ननवरे जितेंद्र बाबा - सभापती**
२) मा. तानाजी विठ्ठल खाडे
**३)** मा. लोंढे शुभांगी संतोष
**४)** मा. मोटे किरण बाळासाहेब
५) मा. गिता सुशिल मंचरकर

या शिवाय मा.फुंदे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.बेंडे – प्रशासन अधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक १८/०३/२०१५ व २५/०३/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१३)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ८९ विषय क्रमांक - १
दिनांक - ०६/०४/२०१५ विभाग - क्रीडा
सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.सुरेश म्हेत्रे
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/३३२/२०१५, दि.२६/०३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.महापालिका सभा ठराव क्रमांक १२०६, दि.२०/१०/२०११ व आदेश क्र.क्रीडा/७/कावि/ १८८ /२०१२, दि.०४/०७/२०१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे खेळाडू दत्तक योजना २०१२-१३ मधील ८३ पैकी ६२ खेळाडूंना सन २०१४-१५ मध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे लाभ देणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.६५,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेस व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ९० विषय क्रमांक - २

दिनांक - ०६/०४/२०१५

सुचक - मा.किरण मोटे अनुमोदक – मा.तानाजी खाडे

संदर्भ - मा.किरण मोटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव –

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ३० (२) मध्ये विशेष समित्या नियुक्त करण्याची तरतुदीनुसार मा.महापालिका सभा ठराव क्र.५१२९, दि.०९/०४/२००४ अन्वये क्रीडा समिती सभा स्थापन करणेस व अन्य विशेष समित्यांच्या सदस्य नेमणुकांच्या वेळीच क्रीडा समिती सदस्यांची नेमणूक करणे कामीची तजवीज ठेवणेस तसेच झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती प्रमाणेच सोयी सुविधा क्रीडा विभागामार्फत क्रीडा समितीस उपलब्ध करुन देणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सन २००४-२००५ पासून क्रीडा समिती सभेची स्थापना झाली असून या समितीकडे खालीलप्रमाणे कामकाज सोपविणेत आलेले आहे.

१) क्रीडा कला विषयी सर्व प्रश्न, धोरण आखणी व अंमलबजावणी करणे.
२) क्रीडा विभागाकडील र.रु.५० लाख पेक्षा अधिक नाही अशा खर्चास प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावावर अंतिम निर्णय घेणेचे अधिकार व र.रु.५० लाखापेक्षा अधिक अशा खर्चास प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावावर शिफारस करुन मा.महापालिका सभेपुढे पाठविणे.
३) क्रीडा कला विभागाचे सर्व प्रकारचे कामकाज करणेबाबतचे अधिकार.

क्रीडा विभागांतर्गत विविध क्रीडा सुविधा, विविध क्रीडा स्पर्धा आयोजन कामकाज व नागरिकांच्या तक्रारी कमी होण्याच्या दृष्टीने व कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने मा.क्रीडा समिती सभेकडे खालील प्रमाणे कामकाज सोपविणे आवश्यक आहे.

१) मनपा परिसरातील सर्व क्रीडा सुविधा देखभाल दुरुस्ती कामकाज करुन घेणेकामी क्रीडा विभागाकडे एक स्वतंत्र क्रीडा स्थापत्य विभाग स्थापन करणे व त्याकामी आवश्यक ती तरतूद क्रीडा विभागाकडे उपलब्ध करुन देणे.
२) कला विभाग, संगीत वर्ग, पिंपरी चिंचवड संगीत अकादमीचे कामकाज, सांस्कृतिक कार्यक्रम कामकाज, संगीत महोत्सव, सार्वजनिक वाचनालये, स्पर्धा परीक्षा केंद्र, मा.क्रीडा समिती मार्फत करणे.
३) क्रीडा विभाग या नावा ऐवजी क्रीडा, कला, साहित्य, सांस्कृतिक विभाग स्थापन करणे.
४) क्रीडा, कला, साहित्य, सांस्कृतिक विभाग स्थापन झाल्यानंतर सर्व प्रकारचे कला संगीत महोत्सव सांस्कृतिक कार्यक्रम क्रीडा समिती मार्फत पार पाडणे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ३० (२) मध्ये विशेष समित्या नियुक्त करण्याचे तरतुदीनुसार क्रीडा समिती स्थापन करण्यात आल्याने सदर क्रीडा समिती सभेकडे या पूर्वी नेमून दिलेल्या कामकाजासह वरील प्रमाणे मा.क्रीडा समिती सभेकडे नव्याने कामकाज सोपविणेस, विशेष अधिकार देणेस मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९१ विषय क्रमांक - ३

दिनांक - ०६/०४/२०१५

सुचक - मा.किरण मोटे अनुमोदक – मा.तानाजी खाडे

संदर्भ - मा.किरण मोटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव –

मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१, दि.१८/०१/२०१४ अन्वये म.न.पा.क्रीडा धोरण मंजूर करणेस मान्यता दिलेली आहे. या क्रीडा धोरणातील भाग-१ ई खेळाडू दत्तक योजनेमध्ये अट क्र.२४ मध्ये फेडरेशनमार्फत घेणेत आलेल्या राज्य, राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना याचा लाभ घेता येणार नाही असे नमुद आहे. या अटीमुळे म.न.पा.परिसरातील फेडरेशनमार्फत खेळलेल्या मुलांना या योजनेचा लाभ मिळत नाही. त्यामुळे महाराष्ट्र ऑलिंपिक असोशिएशनशी संलग्न असलेल्या राज्य क्रीडा संघटना व इंडियन ऑलिंपिक फेडरेशनशी संलग्न असलेल्या राष्ट्रीय क्रीडा संघटना यांनी घेतलेल्या वार्षिक राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा, राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या (प्रथम/द्वितिय/तृतीय क्रमांक प्राप्त) खेळाडूंना मा.महापालिका सभेने निश्चित केलेल्या खेळ प्रकारात खेळाडू दत्तक योजनेचा लाभ देणेत येईल अशी अटी व नियम यामध्ये दुरुस्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **ननवरे जितेंद्र बाबा** )
**सभापती**
क्रीडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ २९९ /२०१५
दिनांक : ०७/०४/२०१५

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.